RNI No. MAHBIL/2009/35527

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार—क

वर्ष २, अंक २७] शनिवार, ऑगस्ट ६, २०१६/श्रावण १५, शके १९३८ [पृष्ठे ३, किंमत : रुपये ९.००

असाधारण क्रमांक ४०

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाव्यतिरिक्त इतर वैधानिक प्राधिकाऱ्यांनी तयार केलेले (भाग एक, एक-अ व एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले वैधानिक नियम व आदेश यांव्यतिरिक्त इतर) वैधानिक नियम व आदेश ; यात भारत सरकार, उच्च न्यायालय, पोलीस आयुक्त, आयुक्त (राज्य उत्पादन शुल्क), जिल्हादंडाधिकारी व निवडणूक आयोग, निवडणूक न्यायाधिकरण, निवडणूक निर्णय अधिकारी व निवडणूक आयोगाखालील इतर प्राधिकारी यांनी तयार केलेले वैधानिक नियम व आदेश यांचा समावेश होतो.**

**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग**

१३ वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा, मुंबई ४०० ००५

**अधिसूचना**

**विद्युत अधिनियम, २००३.**

क्र. मविनिआ/तांत्रिक/परवाना अटी/माईंडस्पेस/२०१६/००४४०.— विद्युत अधिनियम, २००३ चे कलम १८१ आणि या संबंधात त्यास समर्थ करणाऱ्या अन्य सर्व अधिकारांचा वापर करुन महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग याद्वारे 'महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग [ मे. सिरिन प्रॉपर्टीज् प्रायव्हेट लिमिटेड (एसपीपीएल) च्या ऐरोली, ठाणे येथील माहिती तंत्रज्ञान/माहिती तंत्रज्ञानावर आधारित सेवा विषयक विशेष आर्थिक क्षेत्राला (आयटी/आयटीइएस एसईझेड) लागू असलेल्या वीज वितरण परवान्याच्या विशिष्ट अटी ] विनियम, २०१३' ('मुख्य विनियम') या विनियमांमध्ये सुधारणा करण्यासाठी खालील विनियम करीत आहे :—

१. **संक्षिप्त नाव, व्याप्ती आणि प्रारंभ.**— (१) या विनियमांना 'महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग [ मे. सिरिन प्रॉपर्टीज् प्रायव्हेट लिमिटेड (एसपीपीएल) च्या ऐरोली, ठाणे येथील माहिती तंत्रज्ञान/माहिती तंत्रज्ञानावर आधारित सेवा विषयक विशेष आर्थिक क्षेत्राला (आयटी/आयटीइएस एसईझेड) लागू असलेल्या वीज वितरण परवान्याच्या विशिष्ट अटी ] (पहिली सुधारणा) विनियम, २०१६' असे म्हणावे.

(२) हे विनियम **शासकीय राजपत्रात** ज्या दिनांकास प्रसिद्ध होतील त्या दिनांकापासून अंमलात येतील.

२. **मुख्य विनियमांच्या विनियम २.१(एफ) मध्ये सुधारणा.—** मुख्य विनियमांमधील विनियम २.१ (एफ) खालीलप्रमाणे बदलण्यात येईल, जसे की,—

'एसपीपीएल' म्हणजे कंपनी अधिनियम, १९५६ अंतर्गत दिनांक २३ डिसेंबर २००३ रोजी नोंदणी झालेली आणि भारत सरकारच्या वाणिज्यिक आणि उद्योग मंत्रालयाच्या वाणिज्यिक विभागाने निर्गमित केलेल्या पत्र क्र. एफ.२/९४/२००६-इपीझेड, दिनांक २३ ऑक्टोबर २००६ आणि अधिसूचना क्र. एस.ओ.१८७६(इ), दिनांक २ नोव्हेंबर २००७ अन्वये आयटी/आयटीइएस विशेष आर्थिक क्षेत्राकरिता विकासक म्हणून मान्यता दिलेली 'सिरिन प्रॉपर्टीज् प्रायव्हेट लिमिटेड'; आणि तिच्या नावात झालेल्या बदलाच्या परिणामस्वरुप, म्हणजे आणि संदर्भानुसार आवश्यक असेल त्याप्रमाणे त्यामध्ये, कंपनी निबंधकांनी दिनांक २३ नोव्हेंबर २०१५ रोजी निर्गमित केलेले नवीन विधीसंस्थापन प्रमाणपत्र आणि भारत सरकारच्या वाणिज्यिक आणि उद्योग मंत्रालयाच्या वाणिज्यिक विभागाने दिनांक ३१ मार्च २०१६ रोजी दिलेल्या मान्यतेनुसार, माईडस्पेस बिझनेस पार्क्स प्रायव्हेट लिमिटेडचा, समावेश असेल.

**अश्वनी कुमार सिन्हा,**
सचिव,
महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग.

मुंबई,
दिनांक ४ ऑगस्ट २०१६.

**सूचना.—** महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग [ मे. सिरिन प्रॉपर्टीज् प्रायव्हेट लिमिटेड (एसपीपीएल) यांना ऐरोली, ठाणे येथील माहिती तंत्रज्ञान/माहिती तंत्रज्ञानावर आधारित सेवा विषयक विशेष आर्थिक क्षेत्रासाठी (आयटी/आयटीइएस एसईझेड) लागू असलेल्या वीज वितरण परवान्याच्या विशिष्ट अटी ] विनियम, २०१३, **शासकीय राजपत्रात** दिनांक २१ ऑगस्ट २०१३ रोजी अधिसूचित करण्यात आले होते.